R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : २०

दि. २८ डिसेंबर २०२५, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## बौद्धजन पंचायत समिती मनुवादी विचारांना गाडून खऱ्या अर्थाने लोकशाहीची अंमलबजावणी करणारी संस्था आहे - आनंदराज आंबेडकर

महाड :- भारतीय संविधानाच्या आधी विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कोकणस्थ बांधवांच्या सामाजिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी १९४१ साली बौद्धजन पंचायत समितीची स्थापना केली व समितीचा कारभार व्यवस्थित व पारदर्शक पध्दतीने होण्यासाठी समितीला घटना बहाल केली. याच घटनेच्या अनुषंगाने लोकशाही मार्गाने दर पाच वर्षांने बॅलेट पेपरवर निवडणुका लढवून लोकमतदानातून निवडून आलेल्या उमेदवारांमधून २१ जणांचे व्यवस्थापन मंडळाची



निवड केली जाते, शासनाची जशी वेगवेगळी खाती आहेत त्याचप्रमाणे बौद्धजन पंचायत समितीच्या अर्थ समिती, निवडणूक समिती, संस्कार समिती, विवाह समिती, शिक्षण समिती, न्यायदान समिती अश्या पारदर्शक पद्धतीने कामकाज करणाऱ्या वेगवेगळ्या सोळा समित्या आहेत, बौद्धजन पंचायत समिती ही संघटनात्मक कामकाजावर जास्त भर देऊन नवोदित शिशूच्या जन्मापासून ते मनुष्याच्या पुण्यानुमोदन कार्यक्रमापर्यंत सर्व सोपस्कार समितीच्या माध्यमातून केले जातात आणि यातूनच कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देऊन कार्यकर्ते घडवले जातात म्हणूनच बौद्धजन पंचायत समिती जणू कार्यकर्ते निर्मितीची फॅक्टरी आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःकरता नाही तर मानवी हक्कांसाठी पाण्याला आग लावून महाड भूमीत क्रांती केली आणि आम्ही देखील मानव आहोत हे जगाला ठणकावून सांगितले. २५ डिसेंबर १९२७ साली मनुस्मृती दहन करून गुलामीच्या बेड्या तोडून स्त्री पुरुषांना व तळागाळातील सर्वच आबालवृद्धांना मुक्ती दिली तोच आपला खरा स्वतंत्र दिन आहे असे मी मानतो. बाबासाहेबांनी लावलेली ही क्रांतीची ज्योत अशीच आपण धगधगती ठेवून ती पुढील पिढीकडे सुपूर्द करायची आहे, तेव्हा बाबासाहेबांचे विचार आपण आत्मसात करून आपल्या मुलांना शैक्षणिकदृष्टीने सुशिक्षित करून त्यांना आदर्श नागरिक घडवायचं आहे असे प्रतिपादन आनंदराज आंबेडकर यांनी मनुस्मृती दहन तथा मानवमुक्ती दिनाच्या ९८ व्या वर्धापनदिनानिमित्त महाड क्रांतिस्तंभाजवळ उपस्थितांना मार्गदर्शन करीत असताना केले.

बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी ९८ वा मनुस्मृती दहन तथा मानवमुक्ती दिन सभापती आनंदराज आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली महाड येथे क्रांतिस्तंभाजवळ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी आनंदराज आंबेडकर यांच्या शुभहस्ते चौकाचौकात ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करीत त्यांची रॅली महाड क्रांतीस्तंभाजवळ दाखल झाली तिथे बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांना मानवंदना देण्यात आली तद्नंतर संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार व सचिव मनोहर बा. मोरे यांनी आपल्या गोड व सुमधुर वाणीने पूजाविधी संपन्न केला, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस राजेश घाडगे यांनी लाघवी भाषाशैलीसह आपल्या पहाडी व रुबाबदार आवाजात केले.

अध्यक्षीय भाषणात पुढे आनंदराज आंबेडकरांनी पुढे सामाजिक संगटनाच्या आणि नगरपालिकांच्या माध्यमातून महाराष्ट्रातून आलेल्या माझ्या बांधवांची याठिकाणी कोणत्याही प्रकारची सुविधा केली नाही असे दिसत असून त्यांची गैरसोय झाल्याचे माझ्या पाहणीत निदर्शनास आले आहे म्हणून यापुढे माझ्या येणाऱ्या बांधवांसाठी बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने भोजनदान व इतर सुविधा देण्यात येतील असे नमूद केले. तसेच उपसभापती विनोद मोरे यांनी मनुस्मृती दहन व मानवमुक्ती दिनाचे महत्व पटवून देत असताना आज सुध्दा मनुवादी तळागाळातील लोकांवर अत्याचार करतात तर त्याकाळी कर्मठता शिगेला असताना काय परिस्थिती असेल तरीदेखील अश्या परिस्थितीत बाबासाहेबांनी मनुवाद्यांविरोधात लढा पुकारून मनुवादी विचारसरणीला सुरुंग लावला ह्यातूनच बाबासाहेबांची ताकद दिसून येते असे नमूद केले. तसेच माजी कार्याध्यक्ष व पतपेढी अध्यक्ष किशोर मोरे यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रीवर्धन तालुक्यातील कोण मांडले गावात आले तिथून आंबा बोटीने ते दासगावला पोहोचले व पुढे बैलगाडीने ते याठिकाणी दाखल झाले म्हणून येणाऱ्या शतकमहोत्सवाची सुरवात बाबासाहेबांनी ज्या पद्धतीने येथे आगमन केले त्यानुसार आपण तिथून सुरवात करावी असे नमूद केले. कार्यसम्राट कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांनी आपल्या भाषणात भैय्यासाहेबांनी क्रांतिस्तंभाची पायाभरणी केली व त्याचे उद्घाटन २५ डिसेंबर १९८६ साली वसंतराव नाईक, यशवंतराव चव्हाण यांनी केले, सदर क्रांतिस्तंभ हा आपल्या मानवमुक्तीची निशाणी आहे असे नमुद केले.



उपकार्याध्यक्ष एच. आर. पवार, महिला आघाडी उपाध्यक्षा सुजाताताई पवार, क्रांतिभूमीचे सुपुत्र भगवान तांबे आदींनी आपले विचार मांडून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सदर प्रसंगी अतिरिक्त चिटणीस श्रीधर साळवी, चिटणीस यशवंत कदम, अनिरुद्ध जाधव, श्रीधर जाधव, रवींद्र शिंदे, राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, गोविंद तांबे, तुकाराम घाडगे, विलास जाधव, गजानन तांबे, अशोक मोहिते, अतुल साळवी, सदानंद येलवे, तुकाराम घाडगे, बौद्धाचार्य कासारे, रत्नागिरी जिल्हा गटप्रतिनिधी उत्तम जाधव, रायगड जिल्हा गटप्रमुख विकास गायकवाड, सिद्धार्थ कांबळे, श्रीधर नाना जाधव, एम. एस. कासारे, सुशीलताई जाधव, अंजलीताई मोहिते, व्यवस्थापन मंडळ, महाड, रत्नागिरी चिपळूण, पेण, पनवेल, अलिबाग, रोहा, म्हसळा या प्रत्येक तालुक्यातील तालुका कमिटी, त्यांचे कार्यकर्ते आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेला भीमसागर याठिकाणी उपस्थित होता, सरतेशेवटी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## तथागत बुद्धांचा विचार मानवतेचा विचार-भिक्खु करुणानंद महाथेरो (दिल्ली)

लातूर-तथागत बुद्धाने सर्व मानव जाती करीता आपल्या नितिमान धम्माची शिकवण दिली आहे. सर्व जीव प्राण्यांचे कल्याण व्हावे यासाठी करुणा, मैत्री आणि अहिंसा या उच्च तत्वाचा उपदेश केला आहे. भवतु सब्ब मंगल आणि बहुजन हिताय सुखाय हा विश्र्व कल्यानाचा मार्ग बुद्धाने सर्वप्रथम सांगितलेला आहे त्यामुळे तथागत बुध्दाचा विचार हा मानवतेच्या हिताचा विचार असल्याचे प्रतिपादन अ. भा. भिक्खु संघांचे संघनायक पू. भिक्खु करुणानंद महाथेरो (दिल्ली) यांनी केले आहे.



बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त बौध्द उपासक-उपासिकांच्यावतीने डॉ. भिक्खु उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली व भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या संयोजनाद्वारे महाविहार, धम्म संस्कार केंद्र, बार्शी रोड, सातकर्णी नगर, रामेगाव ता. जि. लातूर येथे एक दिवशीय आठवी अ. भा. बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. धम्म परिषदेच्या सकाळच्या पहिल्या सत्रात आंबेडकर चौक आणि बौध्द नगर येथून पंचरंगी ध्वजारोहण करून महापुरुषांच्या मुर्तीसह भिक्खु संघ आणि बौध्द उपासक-उपासिका यांची भव्य धम्म मिरवणूक काढण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे मिरवणुकीचे समापन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकास सर्व कार्यकर्ते यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. भिक्खु पय्याबोधी थेरो यांच्या हस्ते ध्वजारोहन करून त्रिशरण पंचशिल वंदना घेण्यात आली.

धम्म परिषदेच्या दुपारच्या दुसऱ्या उदघाट्कीय सत्रात अ. भा. भिक्खु संघांचे संघनायक भिक्खु करुणानंद महाथेरो (दिल्ली) यांच्या हस्ते पूज्य भिक्खु संघ, प्रमुख अतिथी यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. यावेळी हजारोंच्या संख्येने बौध्द जनसमुदाय उपस्थित होता. प्रारंभी सामूहिक बुद्ध वदंना करून भिक्खु संघांचे व मान्यवरांचे स्वागत केले गेले. यावेळी 'सातकर्णी' स्मरणिके सहीत आर्या मेत्ता, डॉ. मा. ना. गायकवाड यांच्याही ग्रंथाचे प्रकाशन सर्वांच्या हस्ते करण्यात आले.



आठव्या बौध्द धम्म परिषदेस विशेष अतिथी म्हणून प्रख्यात सिने अभिनेते गगन मलिक, माजी मंत्री आ. अमित देशमुख, माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना गगन मलिक म्हणाले की, बौध्द समूहाने धम्माचे तंतोतंत पालन करून भारतात बौध्द धम्म प्रसारित करण्यासाठी बौध्द अनुयायांनी उत्साहात काम करणे आवश्यक आहे.

यावेळी बोलताना माजी मंत्री आ. संजय बनसोडे म्हणाले की, बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल संस्था ही लातूर जिल्ह्यात बौध्द धम्माचे प्रभावी काम करत असल्याचे नमूद करीत महाविहार धम्म संस्कार केंद्रास येणाऱ्या काळात तीर्थक्षेत्र विकासाचा 'ब' दर्जा प्राप्त करून व विकास निधी मिळवून देण्याचे आश्र्वासनत्यांनी दिले.

यावेळी बोलताना माजी मंत्री आ. अमित देशमुख म्हणाले





की, बौध्द धम्म हा भारताचा मुळ धर्म आहे. गौतम बुध्दामुळे भारताची जगात विशेष ओळख आहे. पानगाव येथील चैत्य स्मारक व महाविहार सातकर्णी नगर हे दोन्ही श्रद्धास्थाने लातूर जिल्ह्यातील प्रमुख केंद्रे आहेत. महाविहार सातकर्णी नगर धम्म केंद्र हे येणाऱ्या काळात बौध्द धम्माची बुध्दसृष्टी साकारण्यासाठी स्वतः कठीबद्द असल्याचे अभिवचन त्यांनी दिले.

यावेळी श्रीलंकेचे माजी खासदार भिक्खु अतुरलीये रतन महाथेरो यांच्या सह, डॉ. खेमधम्मो महाथेरो, प्राचार्य सत्यपाल महाथेरो, डॉ. इंदवंस महाथेरो, भिक्खु करुणानंद महाथेरो, भिक्खु नागसेन, भिक्खु पय्याबोधी थेरो, भिक्खु धम्मबोधी थेरो, भिक्खु सुमेध नागसेन इत्यादी भिक्खुंची धम्मदेशना रात्री उशिरा पर्यंत झाली.

यावेळी भिक्खु धम्मानंद महाथेरो, शिलरत्न थेरो, सुभूती थेरो, नागसेनबोधी थेरो, भंते बोधीराज, भंते पय्यावंस इत्यादी मोठ्या संख्येने भिक्खु संघ उपस्थित होते.

धम्मदेशने नंतर प्रसिद्ध गायक विकास राजा (नागपूर) यांचा बुध्द-भीम गीतांचा प्रबोधनात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला.

या परिषदेस आनंद (दिल्ली), लातूर ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी साहेबराव नरवाडे, डॉ. सुधाकर गुळवे, बसवंत उबाळे, प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, संजय सावंत, एम.एन. गायकवाड, आनंद नरंगलकर, मल्लिकार्जुन करडखेलकर, रघुनाथ बनसोडे प्रा. यु. डी. गायकवाड, भिमराव चौदंते, डॉ. संजय गवई, बाबा कांबळे, सुशील चिकटे, विनोद खटके, आतिश चिकटे, कैलाश कांबळे, प्रा. प्रवीण कांबळे, डॉ. विजय अजनीकर, जि. एस. साबळे, पाडुरंग अंबुलगेकर, आर. एस. सोनकांबळे कांबळे, डॉ. दुष्यंत कटारे, प्रविण सूर्यवंशी, सचिन गायकवाड, कॅप्टन माधव कांबळे, सुधाकर कांबळे, विठ्ठल जाधव, संजय ओहळ, अन्तेश्र्वर थोटे, डॉ. अरुण कांबळे, सतिश कांबळे, विशाल वाहुळे, निलेश बनसोडे, आशा चिकटे, शोभा सोनकांबळे, सुजाता अजनीकर, विद्या ससाणे, कांचन अजनीकर, पंचशिला बनसोडे, शशिकला सुरवसे, कल्पना कांबळे, रेखा सुरवसे, निर्मला थोटे, शकुंतला नेत्रगांवकर, कविता कदम, सुनीता गायकवाड, निर्मला मधाळे, सरिता बनसोडे, भाग्यश्री सावंत आणि ममता गवई यांच्या सह हजारोंच्या संख्येने बौध्द उपासक उपासिका उपस्थित होते.

धम्मपरिषदेचे प्रास्ताविक केशव कांबळे यांनी केले आणि सूत्रसंचालन प्रा. देवदत्त सावंत यांनी केले.परिषदेच्या यशस्वीतेसाठी उदय सोनवने, विलास आवशंक, ज्योतीराम लामतुरे, अनिरुध्द बनसोडे, राजेश कदम, सतिश मस्के, करण ओव्हाळ, गौतम आदमाने, यशपाल मस्के, कुमार सोनकांबळे, समाधान मस्के, अविनाश आदमाने, मिलिंद धावारे यांच्यासह धम्मसेवक ग्रुपच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय...

# ओबीसी जनगणना

विलंब, वास्तव आणि राजकीय अर्थ

प्रस्तावना

भारत हा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विविधतेचा देश आहे. या विविधतेचे वास्तव धोरणनिर्मितीत अचूकपणे प्रतिबिंबित होण्यासाठी विश्र्वसनीय आकडेवारी आवश्यक असते. याच पार्श्र्वभूमीवर ओबीसी (जींहशी इरलज्ञुरीव उश्ररीीशी) जनगणना किंवा व्यापक जात–निहाय जनगणना हा मुद्दा पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे. ओबीसी जनगणना केव्हा होणार? हा प्रश्न केवळ तारखेपुरता मर्यादित नसून, तो सामाजिक न्याय, संसाधनांचे वाटप आणि लोकशाहीची गुणवत्ता यांच्याशी निगडित आहे.

ऐतिहासिक पार्श्र्वभूमी

भारतात १९३१ साली शेवटची पूर्ण जात–निहाय जनगणना झाली. त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात जनगणनेमध्ये अनुसूचित जाती (डउ) व अनुसूचित जमाती (डढ) यांची माहिती घेतली गेली; मात्र ओबीसींची स्वतंत्र, सविस्तर मोजणी झाली नाही.

२०११ मध्ये करण्यात आलेल्या डेलळे एलेपोळल रपव उरीींश उशर्पीीी (डएउउ) मधील जातीय आकडे अपूर्ण व त्रुटीपूर्ण असल्याचे सांगून केंद्र सरकारने ते अधिकृतपणे वापरात आणले नाहीत.

सध्याची स्थिती : ओबीसी जनगणना केव्हा?

कोविड–१९ मुळे २०२१ ची जनगणना पुढे ढकलण्यात आली. आता भारत सरकार २०२७ मध्ये होणाऱ्या आगामी जनगणनेत जात–निहाय माहिती संकलन करण्याच्या दिशेने पावले टाकत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

२०२६ च्या उत्तरार्धात तयारी

२०२७ मध्ये प्रत्यक्ष जनगणना प्रक्रिया

त्यानंतर काही काळात आकडेवारीचे विश्र्लेषण व प्रकाशन

म्हणजेच, ओबीसी जनगणना २०२७ च्या जनगणनेचा भाग म्हणून होण्याची शक्यता आहे, मात्र त्याचे अंतिम निष्कर्ष त्वरित उपलब्ध होणार नाहीत.

ओबीसी जनगणना का आवश्यक आहे?

१ॅ सामाजिक न्यायासाठी

आजही आरक्षण, शैक्षणिक सुविधा, रोजगार योजना यांचे नियोजन जुनी किंवा अपुरी आकडेवारी वापरून केले जाते. अचूक ओबीसी लोकसंख्या समजल्यास वास्तविक गरजांनुसार धोरणे आखता येतील.

२ॅ धोरणांची प्रभावी अंमलबजावणी

कल्याणकारी योजना अनेकदा `पश ाळूश षळीीं रश्रश्र पद्धतीने राबवल्या जातात. जात–निहाय माहिती उपलब्ध असल्यास अतिमागास, मागास आणि तुलनेने सक्षम ओबीसी गटांमध्ये भेद करता येईल.

३ॅ लोकशाहीतील पारदर्शकता

लोकसंख्येचा मोठा हिस्सा असलेल्या ओबीसी वर्गाबाबत अधिकृत आकडेच उपलब्ध नसणे ही लोकशाहीतील मोठी विसंगती मानली जाते.

विरोधकांचे मुद्दे व चिंता

=८ सामाजिक ध्रुवीकरणाचा धोका – जात–निहाय आकडे समाजात विद्यमान जातीय ओळखी अधिक ठळक करतील, असा दावा केला जातो.

=८ राजकीय वापराची शक्यता – निवडणुकांच्या राजकारणात जातीय आकडे ींश लरपज्ञ श्रिळींलळी साठी वापरले जाऊ शकतात.

=८ प्रशासनिक गुंतागुंत – हजारो जाती, पोटजाती आणि स्थानिक नावांमुळे अचूक वर्गीकरण करणे कठीण आहे.

मात्र वास्तव काय सांगते?

जात ही भारतीय समाजातील आधीच अस्तित्वात असलेली वस्तुस्थिती आहे. आकडेवारी लपवून किंवा पुढे ढकलून असमानता नाहीशी होत नाही. उलट, माहितीअभावी चुकीची धोरणे राबवली जाण्याचा धोका वाढतो. प्रश्न हा जनगणना करावी का? असा नसून, ती कशी आणि कशासाठी वापरावी? असा आहे.

## नगरसेवक कसा असावा...

नगरसेवक म्हणजे फक्त एक पद नाही तो तुमच्या घराचा तुमच्या परिसराचा तुमच्या विश्र्वासाचा रक्षक असतो..!

**न** : म्हणजे नळ, पाण्याची नेहमी व्यवस्था करणारा पाण्यासाठी कधीही त्रास होऊ नये याची काळजी घेणारा...

**ग** : म्हणजे गटार स्वच्छतेला नेहमी प्राधान्य देणारा परिसर नेहमी स्वच्छ ठेवणारा...

**र** : म्हणजे रस्ता, बिना खंड्याचे वेळेवर पूर्ण होणारे रस्ते तयार करणारा...

**से** : म्हणजे सेवा करणारा,जनतेसाठी नेहमी तयार असणारा...

**व** : म्हणजे विश्र्वास, दिलेले वचन पाळणारा शब्दावर ठाम असणारा...

**क** : म्हणजे कार्यशील,बोलण्यापेक्षा कृतीतून विश्र्वास दाखवणारा जनतेच्या हितासाठी न थांबता काम करणारा...

हा आहे नगरसेवकाचा खरा अर्थ ३६५ दिवस तुमच्या सेवेसाठी तुमच्या हक्काचा माणूस म्हणजे तुमचा भावी नगरसेवक : मिशन २०२६ कल्याणराव हनवते ( प्रभाग क्रमांक २३, क )

**नेरूळ नवी मुंबई.**

# मराठवाड्याच्या सर्वांगीण विकास साधायचा तर साहित्य संस्कृती विकसीत करावीच लागेल

शिरुर अनंतपाळ :– मराठवाड्याचा खर्या अर्थाने सर्वांगीण विकास साधायचा असेल तर,या विभागातील राजकीय नेते, कलावंत,लेखक,समीक्षक,वाचक यांच्यासोबत काम करणार्या प्रशासनातील वरिष्ठ अधिकार्यांनी येथे साहित्य संस्कृती वाढीस लागण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील,त्यासाठी अशा प्रकारची लहान मोठी साहित्य संमेलनेही पुरक ठरतील असे प्रतिपादन थोर विचारवंत डॉ.नागोराव कुंभार यांनी येथे केले.

मराठी भाषा विभाग,महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,मुंबई यांच्या अनुदानातून,श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालय यांच्यावतीने दि.२७ ते २८ डिसेंबर २०२५ या दिवशी मोरया लॉन्स येथील स्मृतीशेष शिवराज पाटील चाकूरकर मराठी साहित्य नगरीतील, मातोश्री हरिबाई माधवराव पाटील मंचावर आयोजित ग्रंथ रसिक जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष पदावरुन डॉ. नागोराव कुंभार बोलत होते. मंचावर संमेलन उद्घाटक प्रा.डॉ.रणधीर शिंदे,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे राज्याचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार, मुख्यमंत्री सचिवालयातील प्रशासकीय अधिकारी कवयित्री डॉ.मंजुषा कुलकर्णी,माजी जि.प.उपाध्यक्ष ॲड. संभाजी पाटील,महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्रा.श्रीधर नांदेडकर, राज्य ग्रंथालय संघाचे कार्योपाध्यक्ष राम मेकले,ज्येष्ठ साहित्यिक धनंजय गुडसूरकर,छत्रपती संभाजी नगरचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,गडचिरोली जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील गजभारे,ग्रंथमित्र युवराज जाधव,ज्येष्ठ शिक्षण तंत्र प्रभाकरराव कुलकर्णी, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. फ.म.शहाजिंदे,ज्येष्ठ साहित्यिक दगडू लोमटे, अरुणा प्रकाशनचे राजकुमार बिरादार,श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालयाचे अध्यक्ष तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष एल.बी. आवाळे,सचिव डॉ.राजकुमार बोपलकर आदिंची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.नागोराव कुंभार म्हणाले की,आपणाला अर्थपूर्ण जीवन जगायचे असेल तर अन्न,वस्त्र,निवारा,शिक्षण आदी मुलभूत सुविधांची गरज असते तद्वतच मनाचीही जडणघडण होण्यासाठी लागणार्या गरजा पूर्ण करण्याचे काम साहित्य,तत्वज्ञान करत असते.किंबहुना त्या केवळ तंत्रज्ञान,विज्ञानाने पूर्ण होणार नाहीत. कोणताही समाज अथवा देशाला पुढे जायचे असेल तर विचारांची गरज भासते, ते मोठ्या व्यक्तींकडून मिळते त्याला देशाची सीमा नसते, ते वैश्विक




महर्षी शिंदे यांनी म्हटल्याप्रमाणे असतात.जे समाजाची वैचारिक धारणा पुढे नेते. कोणताही देश आणि समाज त्या देशातील राज्यकर्त्या नेत्यांमुळे ओळखला जात नाही तर तिथे असलेले कलावंत,साहित्यिक,विचारवंत यामुळे जगात ओळखला जातो. मीठाशिवाय जेवणाला चव नाही,तसे जीवनात तत्वज्ञान नसेल तर जीवन निरस आहे. सक्षम समाजमन,माणूस घडविण्याचे काम साहित्य तत्वज्ञान करते.सुख–दुःखाच्या तीव्र दृष्टिकोणाशिवाय दर्जेदार साहित्य निर्माण होत नाही.आज देशाचं नेतृत्व करणार्यांनी साहित्य,तत्वज्ञानाकडं दुर्लक्ष झाल्याने अधःपतन झाले आहे. जेव्हा जेव्हा नेतृत्वाचा,समाजाचा तोल जातो तेव्हा त्याला आधार देण्याचे काम साहित्य करते.म्हणून साहित्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. दर्जेदार साहित्य नसेल तर समाज असुरक्षित राहतो असे सांगून अशी साहित्य संमेलने महत्वाची ठरतात,असे ठाम प्रतिपादनही डॉ.नागोराव कुंभार यांनी यावेळी केले. ज्येष्ठ तत्वज्ञ डॉ.सुरेंद्र बारलिंगे यांनी प्रत्येक तालुक्यात सांस्कृतिक केंद्रे उभारावीत,त्यात नाट्यगृह,ग्रंथालय असावे तिथे लेखन शिबीर,लेखक कलावंतांचे येजा असावी जेणे करुन नव्या पिढीला त्याचा लाभ होईल,कुटुंब,शाळा,महाविद्यालये,धर्मसंस्था,राजकारणी यांच्यावर संस्कार करण्याचे काम साहित्यामुळे होईल, बहुजन समाजात आकलन शक्ती नाही, त्यासाठी अशी संमेलने साह्यभूत ठरतील.हे ओळखून यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य,संस्कृती अनुदान मंडळ सुरु केल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ.रणधीर शिंदे–माहिती तंत्रज्ञान आणि एआयने मानवी जीवन व्यापले आहे,स्मार्ट फोनमध्ये जग जवळ आले असले तरी समाज हरवतो आहे,धार्मिक बुरसटलेपण येवून माणसाचं स्वांतत्र हिरावलं जातंय,धार्मिक उन्मान वाढतो आहे, राजकीय जीवन अस्वस्थ आहे.गावगाडा फुटीच्या वाटेवार आहे.शेती संकटात आहे. व्यापारी,भांडवलदार,दलालांनी शेतीव्यापार ताब्यात घेतला आहे.अशा वेळी या सर्व बदलाावर साहित्याने ठामपणे बोलले पाहिजे.आजचा लेखक यावर तीव्रपणे व्यक्त होत नाही. तशी शक्यता दिसत नाही,तथापि खेड्यात काही अंशी प्रतिभेचा उन्मेष दिसतोय,आजच्या साहित्य संमेलनामधून साहित्याची केंद्रे बहरत जावीत अशी अपेक्षा व्यक्त करुन या संमेलनाचे उद्घाटन झाल्याचे डॉ.रणधीर शिंदे यांनी यावेळी जाहीर केले.

डॉ.मंजुषा कुलकर्णी–विशेष अतिथी डॉ.मंजुषा कुलकर्णी यांनी मराठी भाषा ही जगातल्या ४२ देशात बोलली जाते,देशात ती ४ स्थानावर बोलली जातेय.दरवर्षी देशात १० ते १२ हजार मराठी भाषेतील ग्रंथ प्रकाशित होतात,ती रोजच्या जगण्यात,वागण्यातून व्यक्त झाली पाहिजे,असे सांगून मराठीचा आग्रह धरावा,तिचाव्र प्रेम करा,ती मायभाषा आहे तिची लाज वाटू नये,ज्ञानविज्ञान ज्या भाषेतून दिले जाते तिथे विकास होतो.मराठवाड्यातील संतांनी मराठी भाषेत मोलाचे योगदान दिले आहे असे सांगितले आणि यापुढे वाचकांचा सत्कार केला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

डॉ.गजानन कोटेवार–साने गुरुजी,विनोबा भावे यांच्या साहित्यामुळे समाजाला मोठा आधार मिळाला, सार्वजनिक ग्रंथालय चळवळीमुळे साहित्य विश्व समृध्द व्हायला मदत होतेय,ग्रंथामध्ये माणसाला घडविण्याची धमक आहे असे मत डॉ.गजानन कोटेवार यांनी व्यक्त केले.

तर साहित्यिक देविदास फुलारी यांनी साहित्य संमेलनाची गरज सांगून,कवी आहेत म्हणून समाज आणि असे मत व्यक्त केले. फ.म.शहाजिंदे यांनी कवी,तत्वज्ञ आहेत म्हणून समाज नाही तर समाज आणि म्हणून हे सर्व आहेत ,समाजाकडून जे जे मिळते ते साहित्यरुपाने आपण समाजाला परत देण्याचे काम करतो,समाजाने साहित्यिकांना प्रोत्साहन द्यावेत,त्याशिवाय हे कसे लिहिणार असे विचार मांडले. ॲड.संभाजी पाटील म्हणाले की, समाजात परिवर्तन कसे होईल,यासाठी साहित्यिकांनी प्रयत्न करावेत,देशाची लोकशाही प्रबळ करायची असेल तर दिशा द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली.श्रीधर नांदेडकर यांनीही विचार मांडले.

या प्रसंगी प्रा. फ.म.शहाजिंदे यांची मराठवाडा साहित्य संमेलनाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल, ज्येष्ठ साहित्यिक यांच्या साहित्य चळवळीबद्दल तर अरुणा प्रकाशनचे राजकुमार बिरादार आणि वृत्तपत्र विक्रेते शिवराज खंडापूरे यांचा श्री अनंतपाळ साहित्यसेवा सन्मान देवून गौरव करण्यात आला.याप्रसंगी योगेश आवाळे,गिरीष आवाळे आणि आवाळे परिवाराच्यावतीने श्री अनंतपाळ नवयुवक ग्रंथालयास ५१ हजार रुपयांची देणगि देण्यात आली. प्रारंभी सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.प्रभाकरराव कुलकर्णी यांच्यावरील डॉ.मन्मथ भातांब्रे लिखित ग्रंथ तसेच तुफानातील दिवे,आणि शिक्षक पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले..

या सत्राचे प्रास्ताविक स्वागताध्यक्ष लक्ष्मण आवाळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डी.के. धुमाळे यांनी केले.इंजि.किरण कोरे यांनी आभार मानले. तत्पूर्वी विविध शाळांतील विद्यार्थी,शिक्षक,भजनी मंडळ,साहित्यप्रेमींच्या सहभागाने ग्रंथदिंडी करण्यात आली. त्याचे उद्घाटन उपनगराध्यक्ष अनंत काळे यांच्या उपस्थितीत,नगराध्यक्षा चंद्रकला शिवणे यांनी केले, ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन बालाजी येरोळे यांच्या हस्ते झाले. तर प्रभाकरराव कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.या संमेलनाला साहित्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदरील दोन दिवशीय साहित्य संमेलनासाठी श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालयाचे नामदेव जगताप, विरभद्र भातांब्रे, त्र्यंबकअप्पा आवाळे, श्रीनिवास कुलकर्णी, डॉ.मन्मथ भातांब्रेख काशिनाथ देवंग्रे, उपाध्यक्षा सुनीता देवशटवार, उपसचिव पद्मा यरमलवार, कोषाध्यक्ष सुरेश कोटलवार, सत्यनारायण बंग, शिवाजीराव एरंडे, उमाकांत शिंदाळकर, महेमुद तांबोळी, उज्वला दुरुगकर, उज्ज्वला लादे, वकील नंदा, ललिता शिवणे, लता शेरसांडे, ब्रम्हेचा किरण, बसवराज पुजारी, वैशाली कारेगावकर, सरोजा राजपूत, ग्रंथपाल ग्रंथमित्र काशिनाथ बोडके, सहाय्यक ग्रंथपाल शिवनंदा शिवणे, लिपिक अनंत सूर्यवंशी,गोविंद हंद्राळे, रामाभाऊ कोळगे,गुणवंत भातांब्रे,किरण कोरे, राजेंद्र कुरे आदी परिश्रम घेत आहेत.

# लातुरात दिव्यांग महोत्सव उत्साहात संपन्न २६ शाळेतून ३५० विशेष मुलांचा उत्स्फूर्त सहभाग

लातूर :– बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के – सामंत यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेला दिव्यांग मुलांचा कलामहोत्सव यहाँ के हम सिकंदर लातूर शाखेच्या वतीने स्टिम एज्युकेशन सेंटर लातूर येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाला. यावेळी बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती, मुंबई शाखेचे उपाध्यक्ष तथा सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक ॲड. शैलेश गोजमगुंडे, मध्यवर्ती शाखेचे कोषाध्यक्ष नंदकिशोर जुवेकर, स्टिम एज्युकेशन सेंटर चे ओमप्रकाश झुरुळे, सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. कल्याण बरमदे, सिने अभिनेते अनिल कांबळे, सामाजिक कार्यकर्ते संतोष बिराजदार, स्टिम च्या प्राचार्य पुनम पाठक, बालरंगभूमी परिषद लातूर शाखेचे अध्यक्ष रणजित आचार्य, समिती प्रमुख सुवर्णा बुरांडे या मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व नटराज पूजन करून उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

ॲड. शैलेश गोजमगुंडे मनोगतात



म्हणाले की दिव्यांग बालकांसाठी बालरंगभूमी वर्षभर कार्यरत राहणार आहे. या उपक्रमात जास्तीत जास्त शाळा व संघांनी सहभाग नोंदवावा. या कलामहोत्सवात सादरीकरण करणाऱ्या बालकलाकारांना प्रोत्साहन देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच ओमप्रकाश झुरुळे, डॉ. कल्याण बरमदे, संतोष बिराजदार यांनी आपापली मनोगते व्यक्त केली व सर्वांना शुभेच्छा दिल्या. भव्यदिव्य असा संपन्न झालेला पाहून आलेल्या शाळांनी बालरंगभूमी परिषद लातूर शाखेचे कौतुक केले.

या कलामहोत्सवामध्ये २६ दिव्यांग शाळेतील ३५० बालकलाकारांनी सहभाग घेतला होता. तर अनेक शाळांनी मुलांनी बनवलेल्या वस्तूंचा स्टॉल लावला त्यात अनेक वस्तूंची विक्री झाली. दिव्यांग बालकलाकारांनी सादर केलेल्या एकापेक्षा एक सदरीकरणांनी सर्व रसिक प्रेक्षक भारावून गेले आणि रसिकप्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात उत्तम प्रतिसाद दिला.

या महोत्सवाचे प्रास्ताविक समिती प्रमुख सुवर्णा बुरांडे यांनी केले, सूत्रसंचालन वनिता गोजमगुंडे आणि वसुधा पाटील यांनी केले तर आभार लातूर शाखेचे अध्यक्ष रणजित आचार्य यांनी केले.

सदरील कलामहोत्सव यशस्वीतेसाठी लातूर शाखेचे अध्यक्ष रणजित आचार्य, समिती प्रमुख सुवर्णा बुरांडे, कार्याध्यक्ष मयूर राजापुरे, प्रमुख कार्यवाह नवलाजी जाधव, कोषाध्यक्ष रवि अघाव, सहकार्यवाह रविकिरण सावंत तसेच वनिता गोजमगुंडे, महेश बिडवे, विशाल वाटवडे, प्रिती ठाकूर, महेश बिडवे, वसुधा पाटील, महेश पवार, तेजश्री घवले, सलीम पठाण, तन्मय रोडगे, ऋतुराज सुरवसे, शरीफ पठाण, हिरा वेदपाठक, सुमती बिडवे सोमवंशी यांनी परिश्रम घेतले.

# विनापरवानगी केलेल्या रस्ता कामाच्या चौकशी अहवालानुसार सरपंचपती विरुद्ध कारवाई करण्यात यावी-जयदत्त गलांडे

केज/प्रतिनिधी -केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथील रस्त्याच्या कामाच्या चौकशी अहवालानुसार सरपंचपती विरुद्ध दंडात्मक व फौजदारी स्वरूपाची कारवाई तात्काळ करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे उपअभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग केज यांच्याकडे जयदत्त गलांडे,धीरज वनवे, गुलाब पठाण यांनी केली आहे.



ग्रामीण मार्ग १२३ वर सरपंच पती यांनी अवैधरित्या कुठल्याही परवानगी विना रस्त्यावर खोदकाम करून त्यामध्ये मोठ-मोठे दगड भरलेले व सदर रस्ता हा वाहतुकीस अडथळा निर्माण केला. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग केज यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर कामाची चौकशी समितीमार्फत चौकशी करण्यात आली. या चौकशी समितीमध्ये चौकशी अधिकारी म्हणून श्री हातागळे साहेब यांनी चौकशी करून अहवाल दिला आहे. त्या अहवालाच्या अनुषंगाने संबंधितावर अद्यापही कारवाई करण्यात आलेली नाही. म्हणून आम्ही ३१ डिसेंबर रोजी उप अभियंता यांच्या कार्यालयात, केबिनमध्ये बसून बोंब मारो आंदोलन करणार आहोत.तक्रारदार:-जयदत्त गलांडे

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील ग्रामीण मार्ग १२३ हा रस्ता एका बाजूने खोदण्यात आलेला आहे. सदर रस्ता खोदून त्यामध्ये मोठ मोठे दगड भरण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदर रस्ता हा रहदारीस नागरिकांना अडथळा निर्माण होत आहे.

ग्रामीण मार्ग १२३ हा रस्ता एका बाजूने खोदण्यात आला असून सदर काम करण्यासाठी कोणतीही परवानगी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग केज या कार्यालया कडून घेण्यात आली नाही. सदर रस्ता खोदल्यामुळे वृद्ध व बालके यांना त्रास होत आहे. असे येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे. व तशा आशयाची तक्रार जि.प. बांधकाम उपविभाग केज या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने संबंधित कार्यालयाने चौकशी समिती गठीत केली होती. या चौकशी समितीने सदर ठिकाणी जाऊन पंचनामा करून वरील प्रमाणे अहवाल तयार केलेला आहे.

सदर अहवालात पुढे नमूद केले की, सदरचा रस्ता हा सरपंच पती यांनी खोदला असे सांगण्यात आले. त्या अनुषंगाने त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. व परवानगी विषयी विचारले असता ग्रामसभेने परवानगी दिली. असे त्यांचे म्हणने आले. सदरचा अहवाल हा दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पुढील कारवाईसाठी सादर करण्यात आलेला आहे. परंतु सरपंच पती यांच्यावर अद्यापही कारवाई करण्यात आली नाही. म्हणून दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग केज यांना लेखी निवेदन देऊन सदर प्रकरणी कारवाई करण्यात यावी. अशी मागणी केली आहे. जर प्रशासनाने ३० डिसेंबर पर्यंत कारवाई न केल्यास ३१ डिसेंबर रोजी संबंधित कार्यालयात बोंब मारो आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनकर्त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

सदरचे निवेदन हे जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाचे पटेल साहेब यांनी स्वीकारले आहे.

या लेखी निवेदनावर जयदत्त कल्याणराव गलांडे, गुलाब बाबूमियाँ पठाण, धीरज वनवे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

चिंचोली माळी येथे नागबेट ते मंदिर रस्त्यावर सरपंच पती यांनी जि.प.बांधकाम उपविभागाची परवानगी न घेता सदर रस्ता खोदलेला आहे.सदर रस्ता हा जि.प.बीड यांच्या मालकीचा आहे.सदर रस्ता हा २० मीटर रुंदीचा आहे.सदर रस्त्याच्या खोदकामा बद्दल चौकशी समितीचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. नियमा नुसार संबंधितावार कारवाई करण्यात येईल.

श्री पी.एम.मिसाळ उपअभियंता जि.प.बांधकाम उप विभाग केज

# महाराष्ट्र भूषण राम सुतार यांना दिल्लीत भावपूर्ण श्रद्धांजली

नवी दिल्ली, - जागतिक ख्यातीचे शिल्पकार महाराष्ट्र भूषण डॉ. राम वंजी सुतार यांना आज येथे झालेल्या सभेत विविध मान्यवरांकडून श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी विविध आठवणींच्या माध्यमातून मान्यवरांकडून त्यांच्या जीवनकार्याला उजाळा देण्यात आला.




श्री. सुतार यांचे गेल्या १८ डिसेंबरला नोएडा येथे निधन झाले होते. आज त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दिल्लीतील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथील भीम ऑडिटोरियममध्ये सभा आयोजित करण्यात आली. सभेत प्रारंभी पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आदी मान्यवरांचे शोकसंदेश वाचून दाखवण्यात आले. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी यावेळी आपल्या भाषणात श्री. सुतार यांच्या बालपणीच्या शिल्पकलेतील रुचीपासून ते 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' आणि मुंबईतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ३५० फूट उंच प्रतिमेच्या निर्मितीपर्यंतच्या कारकीर्दीचा उल्लेख केला. श्री सुतार यांनी घडवलेल्या मूर्ती समाजाला ऊर्जा आणि प्रेरणा देतात. त्यांच्या कलाकृतींच्या माध्यमातून इतिहासाच्या जाणिवा जागृत होतात. त्यांचा वारसा अनिल सुतार यांच्या माध्यमातून पुढे समर्थपणे सांभाळला जाईल, असे ते म्हणाले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी यावेळी श्रद्धांजलीपर भाषण केले. त्यांनी सांगितले, श्री. राम सुतार यांनी महाराष्ट्राच्या एका छोट्या गावातून आपला जीवनप्रवास सुरू करत आपल्या श्रेष्ठ कलाविष्काराने जागतिक स्तरावर ठसा उमटवला. 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'सारख्या महान कलाकृती त्यांच्या सार्थ कर्तृत्वाची साक्ष देतात. विविध महान विभूतींची अचूक शिल्पे साकारणाऱ्या सुतार यांच्या दीर्घ कलासाधनेचा आणि बहुआयामी प्रतिभेचा गेल्याच महिन्यात महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्रभूषण पुरस्कार देऊन गौरव केल्याची स्मृती त्यांनी यावेळी जागवली.

महाराष्ट्र परिचय केंद्राच्या वतीने संचालक हेमराज बागुल यांनीही श्रद्धांजली वाहिली. ते म्हणाले, राम सुतार यांचे संपूर्ण आयुष्य कलेला समर्पित होते. त्यांच्या निधनाने भारतीय कला विश्र्वाला जागतिक पातळीवर एक गौरवास्पद ओळख मिळवून देणारा एक महान कलावंत हरवला आहे.

श्री. सुतार यांचे पुत्र आणि शिल्पकार अनिल सुतार यांनी वडिलांच्या नम्र जीवनशैली आणि अखंड कार्यमग्नतेच्या विविध हृदयस्पर्शी आठवणी सांगितल्या. सुतार कुटुंबातील समीर आणि सोनाली यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली.

या सभेला सामाजिक, सांस्कृतिक आणि शिल्पकलेच्या क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्रा.डॉ.केदार व प्रा.डॉ.इबाते यांना युनायटेड किंगडमचे आंतरराष्ट्रीय पेटंट मंजूर

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील प्रा.डॉ.नाथराव केदार व प्रा.डॉ. श्याम इबाते यांना युनायटेड किंगडम् या देशाचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे डिझाईन पेटंट त्यांच्या संशोधनासाठी मिळालेले आहे.त्यांनी रासायनिक प्रक्रिया करण्यासाठी रासायनिक क्रिया नियंत्रित करण्यासाठी नवीन साधन तयार केले असून या साधनाच्या माध्यमातून रासायनिक क्रियेला लागणारा वेळ हा नियंत्रित करून कमी वेळेत अचूक माहिती या साधनाद्वारे प्राप्त होते,यासंबंधीचे संशोधन केल्यामुळे संशोधकांचा लागणारा वेळ कमी होऊन त्यांना त्यांची मदत होऊ शकते.या संशोधनाची दखल घेऊन युनायटेड किंगडम् या देशाने डिझाईन नावाचे पेटंट दिलेले आहे.





या पेटेंटचे महत्त्व सांगताना डॉ.नाथराव केदार यांनी असे म्हटले आहे की,एखादी रासायनिक प्रक्रिया महिनोंमहिने तासनतास चालत असल्यामुळे संशोधन कार्य करत असताना संशोधकांना या सर्व गोष्टींसाठी खूप वेळ द्यावा लागत असे. त्यामुळे त्यांना हे काम करत असताना रात्रंदिवस काम पाहावे लागत असे.परंतु या नवीन संशोधनामुळे संशोधकाचा वेळ कमी झालेला आहे.याचा फायदा नवीन संशोधकांना होणार आहे.

या नावीन्यपूर्ण संशोधनाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे,ललितभाई शाह, रमेशकुमार राठी,सचिव रमेश बियाणी,कोषाध्यक्ष संजय बोरा, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव ड.श्रीकांत उटगे,अजिंक्य सोनवणे, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख हे शेतकऱ्यांचे कैवारी होते-डॉ. गुणवंत बिरादार

लातूर-भारत हा कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचा देश आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेती आणि शेतकऱ्यांना समृद्धदे करणारे धोरणे तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी त्यांनी आपली प्रतिभा ऊर्जा समर्पित केली त्यामुळे ते गरीब शेतकऱ्यांची बाजू मांडणारे शेतकऱ्यांचे कैवारी होते असे प्रतिपादन डॉ. गुणवंत बिरादार यांनी केले.

महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात जयंती उत्सव समिती आणि कार्यालयाच्यावतीने डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे हे होते तर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, डॉ. दिनेश मौने, डॉ. यशवंत वळवी, डॉ. संजय गवई, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. विनायक वाघमारे, डॉ. दीपक चाटे, प्रा. माधव नायणे, प्रा. केशव सूर्यवंशी, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदर्गे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

अध्यक्षीय समारोप प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी केला. सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले तर आभार डॉ. संजय गवई यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजय गायकवाड, शिवशंकर खुब्बा आणि गुरुप्रसाद बिरादार यांनी परिश्रम घेतले.

# रेणापूर कृऊबा काँग्रेसचे संचालक अशोक राठोड यांचा आ. रमेशअप्पा कराड यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश

लातूर - रेणापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक काँग्रेस कार्यकर्ते अशोक रामराव राठोड यांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून शनिवारी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.




लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी सकाळी रेणापूर तालुक्यातील मौजे फरदपूर येथील बंजारा समाजातील काँग्रेसचे कार्यकर्ते रेणापूर बाजार समितीचे संचालक अशोक रामराव राठोड यांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, माजी सभापती अनिल भिसे, भाजपाचे मंडल अध्यक्ष शरद दरेकर, सुरज शिंदे, प्रताप पाटील, फरदपूरचे सरपंच बालाजी राठोड, गरसुळीचे सरपंच अजय राठोड, माजी सभापती विजय चव्हाण, प्रवीण कोतवाल, संजय ठाकूर, नारायण राठोड, गणेश चव्हाण, उत्तम चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, सुभाष राठोड, प्रकाश राठोड, राजसंघ राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

रेणापूर तालुक्यासह संपूर्ण लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून गावागावात वाडी वस्तीत मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून विकास कामांना गती दिली. सर्वत्र होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन मतदार संघातील अनेकजण आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत आहेत. येणाऱ्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदारसंघात शतप्रतिशत भाजपा करण्यासाठी भाजपाचे कार्यकर्ते प्रयत्नशील आहे.

# इतरांची मदत करा तुम्ही आपोआपच प्रकाशमान व्हाल..!

मध्य प्रदेश इंदूर :- महामानव, विश्र्वरत्न,भारतरत्न, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मभूमी असलेल्या मध्य प्रदेशातील इंदूर (महू) येथील सुंदर अशा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकांच्या आवारात साम्यक फाउंडेशनच्या वतीने व्यक्तिमत्व विकास संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. र्यक्रमाचे निमंत्रित अध्यक्ष म्हणून समाजभूषण श्री उत्तमराव दासू तरकसे आसरडोहकर (महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक व विचारवंत) हे हजर होते तसेच प्रमुख पाहुणे म्हणून (भंते) विभूत वॅन्स, प्रा. छाया वंजारी, प्रा. सौरभ सेलेकर, प्रमुख मार्गदर्शक व वक्ते म्हणून डॉक्टर शंकर बगाडे व साम्यक फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मनोहर गजबे असे विचारवंत मंडळी विचार मंचावर उपस्थित होती.



सदर कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात समाजभूषण श्री उत्तमराव तरकसे यांनी इतरांसाठी दिवा पेटवला तर उजेड तुमच्यावर सुद्धा पडणार, त्यात तुमचा चेहरा सुद्धा चमकणार, म्हणून, इतरांची मदत करा तुम्ही आपोआपच प्रकाशमान व्हाल..! निस्वार्थपणे केलेले कुठलेही कार्य सार्थकी लागल्याशिवाय राहत नाही. असे व्यक्तीमत्त्व विकासाला व संस्काराला धरून उपस्थित प्रेक्षकात प्रबोधनात्मक विचार मांडले व मला कार्यक्रमाला निमंत्रित अध्यक्ष म्हणून बोलावल्याने मी संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सदस्याचा मनःपूर्वक अभार मानले तसेच प्रेक्षक वर्गाने सुद्धा त्यांना ऐकण्याकरिता उपस्थित राहिल्यामुळे प्रेक्षकांचे सुद्धा त्यांनी मनपूर्वक अभार मानले एक दिवशीय शिबिराचे खूपच उत्तम प्रकारे आयोजन करण्यात आले असून सर्व उपस्थितांची सकाळी चहा, अल्पहार, दुपारचे जेवण व सायंकाळी चहाची सोय संस्थेच्या वतीने करण्यात आली होती कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# यात्रेच्या तमाशातच झाला तमाशा !

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील सोनीजवळा येथील म्हसोबा यात्रेनिमित्त गावात तमाशा या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.हा कार्यक्रम सुरू असताना किरकोळ कारणावरून दोन तरुणास मारहाण केल्याप्रकरणी बारा जणांविरुद्ध युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सुधीर प्रकाश वैरागे रा.सोनीजवळा ता. केज हे स्वामी रामानंद तीर्थ मेडिकल कॉलेज, रुग्णालय आंबेजोगाई येथील वार्ड क्र.बी/२ येथे उपचार घेत आहेत. युसुफ वडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार सुरेश गीते व महेश कोकाटे यांनी जबाब नोंदवून घेतल्या वरून सुधीर प्रकाश वैरागे यांच्या सोनीजवळा गावात म्हसोबा देवाची दरवर्षीप्रमाणे दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी यात्रेस सुरवात झाली होती. त्यांच्या सोनीजवळा गावामध्ये यात्रेनिमित्त दुपारी बैलगाड्या ओढण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर सायं.५-०० वाजण्याच्या सुमारास सुधीर वैरागे यांच्या घरी देवासाठी नैवेद्य व आलेल्या पाहुण्याकरिता जेवण तयार केले होते.

सदरील जेवनातील नैवेद्य मसोबा देवाला दाखवण्यात करिता सुधीर यांचे वडील नैवेद्य घेऊन पायी म्हसोबाच्या मंदिराकडे गेले. देवाला नैवेद्य दाखवून तेथील देवाचा प्रसाद घेऊन ते परत येत असताना सुधीर वैरागे यांच्या गावातील प्रताप अशोक वैरागे हा तेथेच उभा असताना सुधीर व त्याच्या वडिलांना प्रताप याने विनाकारण शिवीगाळ करू लागला. सुधीर व त्याचे वडील प्रताप यास काही न बोलता घरी पाहुणे जेवू घालायचे असल्याने ते घरी परत आले.

त्यानंतर सुधीर वैरागे यांच्या घरातील सर्वजण व पाहुण्यांनी मिळून जेवण केले. त्यानंतर रात्री ९-०० वाजायच्या सुमारास म्हसोबा मंदिराच्या परिसरातील उर्दू शाळेच्या समोर असलेल्या मोकळ्या जागेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम असल्याने तो कार्यक्रम पाहण्याकरिता सुधीर वैरागे व त्यांचा मेहुना अजय अण्णासाहेब कांबळे रा.केज हे दोघेजण कार्यक्रमाच्या ठिकाणी गेले होते. तेथे गेल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम चालू असताना त्या ठिकाणी आकाश अशोक वैरागे हा सुधीर वैरागे यांच्या जवळ आला व म्हणाला की, तू येथे कशासाठी आलास असे म्हणून सुधीर यास धक्काबुक्की करीत असताना गावातील लोकांनी त्यांना शांत केले.



थोड्यावेळाने सुधीर वैरागे हे कलाकारांना बक्षीस म्हणून पैसे देण्याकरिता स्टेजवर गेले असता अचानक पाठीमागून त्यांच्या गावातील अशोक निवृत्ती वैरागे, राजू निवृत्ती वैरागे, वसंत निवृत्ती वैरागे, कृष्णा शंकर वैरागे, प्रभू मसा वैरागे, विशाल प्रभू वैरागे, प्रताप अशोक वैरागे, आकाश अशोक वैरागे, सचिन साहेबराव वैरागे, गणेश साहेबराव वैरागे, शंकर मस्सा वैरागे, शौर्या उत्तरेश्र्वर लोंढे रा. सोनीजवळा हे सर्वजण अचानक आले व त्यांच्यापैकी आकाश वैरागे यांनी सुधीर वैरागे यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी प्रताप वैरागे, महेश वैरागे, गणेश वैरागे व शौर्य लोंढे यांनी त्यांच्या हातातील काठीने सुधीर यांच्या पाठीवर,उजव्या हाताच्या खांद्याला,दंडाला मारहाण करून मुक्कामार दिला.

त्यावेळी सुधीर वैरागे यांचा मेहुना अजय कांबळे हा भांडणाची सोडवा-सोडवी करण्यासाठी आला असता अजय कांबळे यास देखील वैरागे, राजू वैरागे, गणेश वैरागे व कृष्णा वैरागे या सर्वांनी मिळून त्यांच्या हातातील काठ्यांनी अजय कांबळे यांच्या उजव्या हाताच्या कोपराला, दंडाला व पाठीवर मारहाण करून मुक्कामार दिला.

सचिन वैरागे याने स्टेजवर असलेल्या लोखंडी पाइपने सुधीर यांच्या डोक्यात,उजव्या भवईवर मारून जखमी केले. सुधीर वैरागे यांच्या डोक्यात मार लागल्याने व डोक्यातून रक्त निघत असल्याने त्यांना चक्कर आली व ते खाली बसले. त्यावेळी त्यांच्या भांडणाची सोडवा सोडव सुधीर यांचे वडील प्रकाश वैरागे व त्यांचा मेहुना अजय कांबळे आणि अकबर जिलानी शेख यांनी केले. सुधीर वैरागे यांना उपचारा करिता मोटरसायकल वरून केज येथील उपजिल्हा रुग्णालयात येथे घेऊन गेले. तेथे डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी स्वामी रामानंद तीर्थ मेडिकल, रुग्णालय अंबाजोगाई येथे पाठवण्यात आले असून सध्या आंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय येथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस यांनी सुधीर वैरागे यांचा घेतलेल्या जबाबावरून वडगाव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३२५/२०२५ भारतीय न्याय संहिता (बी एन एस),२०२३ कलम ११८(१),११५(२),१८९(२),१८९(४),१९१(२),१९०,३५२ नुसार अशोक निवृत्ती वैरागे, राजू निवृत्ती वैरागे, वसंत निवृत्ती वैरागे, कृष्णा शंकर वैरागे, प्रभू मस्सा वैरागे, विशाल प्रभू वैरागे, प्रताप अशोक वैरागे, आकाश अशोक वैरागे, सचिन साहेबराव वैरागे, गणेश साहेबराव वैरागे, शंकर मस्सा वैरागे, शौर्या उत्तरेश्र्वर लोंढे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मच्छिंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोह/४४३ सुरेश गीते हे करत आहेत.

## विक्रम डोईफोडे यांची आंतरराष्ट्रीय फुले महोत्सव कवी संमेलनाच्याच्या अध्यक्षपदी निवड



केज/प्रतिनिधी-देशातील मुलींची पहिली शाळा आयोजित दुसरा आंतरराष्ट्रीय फुले महोत्सव २०२६ हा पुणे येथील एस.एम.जोशी फाउंडेशन सभागृह येथे दिनांक २ जानेवारी ते ५ जानेवारी यादरम्यान संपन्न होत आहे. क्रांतीसुर्य महात्मा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. साहित्यप्रेमींनी महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक विजय वडवेकर यांनी केले आहे.

या महोत्सवात कवी संमेलनासाठी केज तालुक्यातील कवी विक्रम डोईफोडे यांची कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे याबद्दल त्यांचे साहित्य क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे

## राष्ट्र सेवा दल दिनदर्शिकेचे ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांच्या हस्ते प्रकाशन

लातूर : राष्ट्र सेवा दलाच्या लातूर आयोजित एका कार्यक्रमात हा प्रकाशन




जिल्हा शाखेच्या वतीने स्व. पन्नालाल सुराणा यांचे मुखपृष्ठ असलेली २०२६ यावर्षीची दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन नुकतेच सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांच्या हस्ते लातूर येथे करण्यात आले.

लातूरच्या दयानंद सभागृहात स्व. मनोहरराव गोमारे यांच्या स्मृतिदिनानिमित्त सोहळा पार पडला. यावेळी समजवादी नेते सुभाष वारे, डॉ.नागोराव कुंभार, अंनिसचे राज्य अध्यक्ष माधव बावगे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, डॉ. गणेश गोमारे, मजविपचे शिवाजी नरहरे, आणि राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कर्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

# श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर तीन महिन्याकरिता बंद भाविकांनी सहकार्य करण्याचे पुणे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

पुणे: (जिमाका): श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकाम तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करण्याच्यादृष्टीने मंदिर ९ जानेवारी २०२६ पासून पुढील तीन महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्याचा निर्णय श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थानने घेतला आहे, भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे.

राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखडा मंजुर केला आहे. या आराखड्यातील अत्यंत महत्वाच्या टप्प्याची अंमलबजावणी तसेच प्रत्यक्ष बांधकामाच्या काळातील सुरक्षितता लक्षात घेता २३ डिसेंबर रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व श्री. भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठकीत सर्वांच्या सहमतीने मंदिर ९ जानेवारीपासून पुढे तीन महिन्यासाठी (महाशिवरात्रीचा १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ हा कालावधी वगळून) तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि भाविकांच्या सोयी करिता महाशिवरात्रीच्या कालावधीमध्ये मंदिर दर्शनाकरिता खुले राहणार आहे.



सन २०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे, त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणारे लाखो भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक पायाभूत सुविधा, सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रणाची कामे वेळेत पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.कामाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने मंदिर परिसर भाविकांसाठी तात्पुरता बंद करण्यात येणार आहे.

मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी श्री भीमाशंकर यांची नित्य पूजाअर्चा, अभिषेक व धार्मिक विधी परंपरेनुसार व नियोजित वेळेत सुरू राहतील. थेट दर्शन बंद या कालावधीत भाविकांनी मंदिर परिसरात प्रवेश अथवा प्रत्यक्ष दर्शन सेवा उपलब्ध राहणार नाही. बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी कर्मचारी तसेच भीमाशंकर ग्रामस्थ वगळता कोणालाही श्री क्षेत्र भीमाशंकर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराचा विकास हा दीर्घकालीन सुरक्षितता, सुविधा आणि भाविकांच्या सोयीसाठी अत्यंत आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ही कामे नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण करण्यासाठी मंदिर तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय मंदिर संस्थानने घेतलेला असून भाविकांनी व स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासन यांना पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी केले आहे.

# गडचिरोली पोलीस दलाच्या बळकटीसाठी ३४ नव्या वाहनांचा ताफा दाखल

गडचिरोली, (जिमाका) – गडचिरोली जिल्ह्यातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान व प्रभावी करण्याच्या दृष्टीने गडचिरोली पोलीस विभागाला ३० स्कॉर्पिओ वाहने, २ बस व २ मोटारसायकल असा एकूण ३४ वाहनांचा ताफा उपलब्ध करून देण्यात आला. या नव्या वाहनांचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.




कार्यक्रमाला वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तथा गडचिरोलीचे सहपालकमंत्री ॲड आशिष जयस्वाल, गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार डॉ. मिलिंद नरोटे नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, पोलीस उपमहानिरीक्षक अंकीत गोयल, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री निलोत्पलउपस्थित होते.

या वाहनांमुळे दुर्गम व आदिवासी भागात जलद गस्त, आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद, नक्षलविरोधी मोहिमा, तसेच दैनंदिन पोलीस कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडणे शक्य होणार आहे. स्कॉर्पिओ वाहने गस्त व ऑपरेशनल कामांसाठी उपयुक्त ठरणार असून, बस वाहनांचा उपयोग पोलीस पथकांच्या वाहतुकीसाठी तसेच विशेष मोहिमांसाठी होणार आहे. मोटारसायकलींमुळे अरुंद व दुर्गम मार्गांवरही पोलीस उपस्थिती वाढण्यास मदत मिळणार आहे.

# राजधानीत डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

नवी दिल्ली : भारताचे पहिले कृषिमंत्री तथा शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला यांनी कॉपर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनाच्या सभागृहात त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.



याप्रसंगी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार तसेच महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी अक्षय गाडेकर यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रेरणादायी जीवनाचा आणि कृषी तथा शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या अविस्मरणीय योगदानाचा सर्वांना परिचय करून दिला.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.